17 OCT 2018
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात दुर्मिळ दिवाळी अंकाचे प्रदर्शन

## बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचा उपक्रम : वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दुर्मिळ दिवाळी अंकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत, डॉ. थोरात, डॉ. शालिनी लिहीतकर आदी मान्यवर.

शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामध्ये दुर्मिळ ग्रंथसंपदा आहे. दुर्मिळ दिवाळी अंकांचा संग्रह हा त्यापैकीच एक आहे. वाचन प्रेरणा दिनानिमित्त या संग्रहाचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाच्या माध्यमतून ज्ञानस्त्रोत केंद्राने एक अनोखा खजिना वाचकप्रेमींना पाहण्यास खुला केला आहे, असे गौरवोद्गार प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी काढले.

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस सर्वत्र वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत सन १९३२पासून प्रकाशित झालेल्या दुर्मिळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. हे दिवाळी अंकांचे प्रदर्शन १८ ऑक्टोबरपर्यंत पाहण्यासाठी मोफत खुले राहणार असून सदर प्रदर्शनाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संगणकीय वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे उद्घाटनही कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रणालीद्वारे ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाची संगणकीय नोंद होणार आहे. यावेळी व्ही.टी. पाटील, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी.बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहीतकर, सर्व ग्रंथालयीन स्टाफ व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# दुर्मीळ दिवाळी अंक संग्रहाचे प्रदर्शन सुरू

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दुर्मीळ दिवाळी अंकांच्या प्रदर्शनास सुरुवात झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले.

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा होतो. त्यानिमित्त विद्यापीठाच्या खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे प्रक्राशित झालेल्या दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविले आहे. १८ पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी मोफत खुले राहणार आहे. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संगणकीय वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या प्रणालीद्वारे ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाची संगणकीय नोंद होणार आहे. याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहितकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दुर्मीळ दिवाळी अंकांच्या प्रदर्शनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत.**

Kolhapur, Kolhapur-Today
17/10/2018 Page No. 5

# शिवाजी विद्यापीठात दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये अतिशय उच्च अभिरुचीसंपन्न आणि दर्जेदार अशी दुर्मीळ ग्रंथसंपदा आहे. दुर्मीळ दिवाळी अंकांचा संग्रह हा त्यापैकीच एक आहे. वाचन प्रेरणा दिनानिमित्त या संग्रहाचे प्रदर्शन भरवून ज्ञानस्रोत केंद्राने एक अनोखा खजिना वाचकप्रेमींना पाहण्यास खुला केला आहे, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा सर्वत्र वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामार्फत सन १९३२ पासून प्रकाशित झालेल्या दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

हे दिवाळी अंकांचे प्रदर्शन १८ ऑक्टोबरपर्यंत सर्वांना पाहण्यासाठी मोफत खुले राहणार असून, या प्रदर्शनाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. खोत यांनी याप्रसंगी केले. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ज्ञानस्रोत केंद्राच्या संगणकीय वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे उद्घाटनही कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## संगणकीय वाचक नोंद प्रणालीचे उद्घाटन

या प्रणालीद्वारे ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाची संगणकीय नोंद होणार आहे. याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहीतकर यांच्यासह ग्रंथालयीन कर्मचारी व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ


# ‘शिवाजी द ग्रेट’च्या आवृत्तीचे शुक्रवारी प्रकाशन



डॉ. बाळकृष्ण

कोल्हापूर, ता. १६ : शिवचरित्रकार प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या ‘शिवाजी द ग्रेट’ इंग्रजी महाग्रंथाच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन शुक्रवारी (ता. १९) होत आहे. महाराष्ट्राच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष व अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते महाग्रंथाचा वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात दुपारी तीन वाजता प्रकाशन सोहळा होईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे संचालक व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी दिली.

डॉ. पवार यांनीच ‘राजर्षी शाहू साहित्यमाले’च्या अंतर्गत महाग्रंथाच्या नूतन आवृत्तीचे संपादन केले आहे.




शिवाजी द ग्रेट महाग्रंथ

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त शाहू संशोधन केंद्रातर्फे ग्रंथाचा संकल्प सोडला होता. त्याच्या संकल्पपूर्तीनिमित्त प्रकाशनदिनी हा चार खंडांचा ग्रंथ अवघ्या ५०० रुपयांत उपलब्ध करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2018
तरुण भारत

# विद्यापीठातील आंतर विभागीय मैदानी स्पर्धेची सांगता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत तीन दिवसापासून महाविद्यालयीन स्तरावरील आंतर विभागीय क्रीडा स्पर्धा सुरू होत्या. मंगळवारी विद्यापीठाच्या ॲथलॅटिक ट्रॅक येथे स्पर्धांची सांगता झाली. शिवराज विद्यासंकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यापीठात गत ५० वर्षांत अशा प्रकारे सर्व महाविद्यालयांना एकत्र करून घेण्यात आलेली ही पहिलीच स्पर्धा आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शेकडो महाविद्यालयातील हजारो खेळाडूंच्या या स्पर्धा एकत्रितरित्या घेतल्या गेल्या. स्पर्धेचे आयोजन, नियोजन व जबाबदारी गडहिंग्लज शिवराज महाविद्यालयाने पार पाडली. शिवाजी विद्यापीठातील क्रीडा अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. पी. टी. गायकवाड, शिवराज महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख प्रा. राहूल मगदूम, प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व कोल्हापूर जिल्हा क्रीडा असोशिएशनचे पदाधिकारी यांच्या परिश्रमातून या स्पर्धा यशस्वी झाल्या.